# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## बुधवार, दिनांक ९ जुलै, २०२५
## (सकाळी ०९.४५ ते १०.४५ वाजेपर्यंत)

**लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(१) सर्वश्री. काशिनाथ दाते, विठ्ठल लंघे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)) यांचे लक्ष वेधतील :-**

"विवाह समारंभासाठी नागपूरकडे जात असताना समृद्धी महामार्गावर अकोलेजवळ झालेल्या अपघातात एमआयडीसी, नवनागापूर (ता.जि.अहिल्यानगर) येथील विवेक संतोष आजबे (वय १७) याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना दिनांक २७ मे २०२५ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आलेली असणे, अपघात झाल्यानंतर मयत विवेकचे वडील यांनी १०८ क्रमांकावर रुग्णवाहिकेसाठी संपर्क केला असता दोन ते अडीच तास उलटूनही रुग्णवाहिका पोहोचली नसल्याचेही समोर आलेले असणे, या प्रवासात एका प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या आवारात रुग्णवाहिका आढळणे, मात्र ती रुग्णवाहिका बंद असल्याचे सांगण्यात येणे, या अपघातातील मयत तरुणाला रुग्णवाहिका व उपचार वेळेवर उपलब्ध न झाल्याने त्याचा दुर्दैवी मृत्यू झालेला असणे, हा शासकीय व्यवस्थेने घेतलेला बळी असणे, यापूर्वीही समृद्धी महामार्गावर बरेच अपघात होऊन दुर्देवी मृत्यू झालेले असणे, समृद्धी महामार्गावर कोणतीही रुग्णालयीन मूलभूत सुविधा उपलब्ध नसणे, शासनाने या प्रकरणाची चौकशी करून मृत्यूला जबाबदार असणाऱ्या संबंधित दोषी विरोधात करावयाची कठोर कारवाई व प्रतिक्रिया."

**(२) ॲड. राहूल कुल, श्री. महेश लांडगे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)) यांचे लक्ष वेधतील :-**

"पुणे रिंगरोडची संकल्पना २७ वर्षापूर्वी, १९९७ च्या प्रादेशिक आराखड्यात मांडली असणे, २०१४-१५ मध्ये प्रकल्प MSRDC कडे सोपवला असणे, हा सुमारे १७० किमीचा रस्ता असून, पुणे - पिंपरी चिंचवड शहरांच्या वाहतूक कोंडीच्या समस्यांना आळा घालण्यासाठी महत्त्वपूर्ण प्रकल्प असणे, विधानसभेची आचारसंहिता जाहीर होण्यापूर्वीच ४२००० कोटी रुपयांच्या सुधारित प्रस्तावाला प्रमा देण्यात येणे, विलंबामुळे २२००० कोटी रुपयांच्या प्रकल्पाची किंमत वाढली असणे, ९०% भूसंपादन पूर्ण झाले असून, प्रत्यक्षात काम चालू झालेलं नसणे, शहरात अनेक ठिकाणी रस्त्यांचे, पुलांचे आणि मेट्रोचे काम

चालू असल्यामुळे नागरिकांना ट्रॅफिक रांगांमध्ये उभे राहून त्रास सहन करावा लागणे, वाहतूक कोंडी फोडण्यासाठी रिंगरोडची संकल्पना असून, साकारण्यास विलंब होणे, न्यायालयीन खटल्यामुळे भूसंपादन अपूर्ण असणे, ९ पॅकेजेमध्ये राबविलेल्या निविदा प्रक्रियेत, पात्र कंत्राटदारांना कार्यारंभ आदेश देण्याचे सांगण्यात आले असून कार्यवाही झाली नसणे, MSRDC, MSIDC व जिल्हाधिकारी पुणे यांनी समन्वय वाढवून विलंब टाळण्याची आवश्यकता असणे, लोणी काळभोर, ता.हवेली, पर्यंतचा प्रस्तावित मेट्रो मार्ग यवत, ता. दौंड, पर्यंत प्रस्तावित करण्याची मागणी असणे, हडपसर-यवत सहापदरी उड्डाणपूल प्रकल्पासाठी ५२६२ कोटी, पुणे-शिरूर ५३ किमी सहापदरी उन्नत मार्गासाठी ७५१५ कोटींची मंजुरी मिळाली असणे, यासंदर्भातील कामे तातडीने सुरु करण्याची आवश्यकता, पुणे- अहमदनगर- छत्रपती संभाजीनगर ६ लेन ग्रीनफील्ड एक्सप्रेसवेसाठी अंदाजे १६००० कोटींच्या खर्चाची आवश्यकता असणे, एकंदर सर्वंकष वाहतूक नियोजनाची गरज असणे, वाहतूक कोंडीमुळे नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी असणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) डॉ. तुषार राठोड, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"नांदेड जिल्ह्यामध्ये अर्धापूर नगरपंचायतीच्या हद्दीतील अर्धापूर नगरपंचायत, अर्धापूर कार्यालय येथील तालाब गल्ली/ मैदान जवळील युनानी दवाखान्याच्या दक्षिणेस असणाऱ्या सार्वजनिक जागेवर अतिक्रमण झालेले असणे, सदर सार्वजनिक मोकळया जागेवर विनापरवाना बांधकाम चालू असणे, सदर अनधिकृत बांधकामाविरुद्ध नगरपंचायत हद्दीतील नागरीकांनी मुख्याधिकारी नगरपंचायत अर्धापूर, पोलीस निरीक्षक, अर्धापूर, जिल्हाधिकारी, नांदेड यांना विनंती अर्ज/निवेदन देऊन सदर अनधिकृत अतिक्रमण निष्कासित करण्याकरीता विनंती केलेली असणे, मुख्याधिकारी अर्धापूर, जि. नांदेड यांच्यामार्फत अनधिकृत अतिक्रमण करणा-या व्यक्तींना नोटीसा दिलेल्या असणे, तसेच मुख्याधिकारी नगरपंचायत अर्धापूर यांच्यामार्फत पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे अर्धापूर यांना सदर अतिक्रमण करुन अनधिकृत बांधकाम करणा-या व्यक्तींवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याकरिता पत्र दिलेले असणे, परंतु आजपर्यंत मुख्याधिकारी नगरपंचायत अर्धापूर व पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे, अर्धापूर यांनी आपसात समन्वय साधून सदर सार्वजनिक जागेवरील अनधिकृत बांधकाम निष्कासित केलेले नसणे, तसेच नियमांचे उल्लंघन करुन सदर बेकायदेशिर बांधकाम करणा-या व्यक्तींच्या विरोधात फौजदारी कारवाई केलेली नसणे, त्याबाबत शासनाची भुमिका व पुढील उपाययोजना."

**(४) श्री. नरेंद्र मेहता, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"मीरा-भाईंदर शहरात ग्रामपंचायत व नगरपरिषद असताना निर्माण करण्यात आलेल्या १९८५ पूर्वीच्या इमारतींच्या पुनर्विकासासाठी आतापर्यंत ३.१७ असा चटई क्षेत्र निर्देशांक मिळणे, सन २०२० मध्ये नवीन UDCPR कायदा लागू झाल्याने शहरातील रस्त्यांच्या रुंदीप्रमाणे त्या त्या क्षेत्रातील इमारतींना ठरविण्यात आलेल्या नुसार FSI मिळत असणे,

परंतु सन २०२२ मध्ये शासनाने मीरा-भाईंदर करता क्लस्टर लागू केल्याने शहरातील ९०% पेक्षा अधिक इमारतींचा समावेश क्लस्टरअंतर्गत झाल्यामुळे शासनाने जो UDPCR लागू केला त्याचा फायदा शहरातील इमारतींना होणार नसणे, क्लस्टर योजनेत असलेल्या नियमानुसार जुन्या इमारतींचे पुनर्विकास करायचे झाल्यास कमीत कमी १०००० मी. क्षेत्र आवश्यक असणे, म्हणजेच किमान दहा ते पंधरा इमारती एकत्र आल्याशिवाय पुनर्विकास करणे शक्य नसणे, तसेच महापालिकेमार्फत घोषित होणाऱ्या धोकादायक इमारतींची संख्या वाढत जाणे, या योजनेमध्ये असलेल्या प्रमुख अटींमुळे प्रत्यक्षात शहरातील जुन्या इमारतींचा पुनर्विकास करणे अशक्य असणे, तसेच इमारतींना धोकादायक घोषित केल्याने त्या रहिवाश्यांची राहण्याची सोय करण्याची जबाबदारी महापालिकेची असणे, परंतु महापालिकेकडे पर्याय उपलब्ध नसल्याने हे देखील शक्य नसणे, यामुळे येथील नागरिकांमध्ये शासनाप्रती निर्माण झालेली असंतोषाची भावना, याकरिता सदर क्लस्टर योजना रद्द करणे किंवा ऐच्छिक करणे व रस्त्याच्या रुंदीप्रमाणे FSI लागू करणेबाबतची अट काढण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

**(५) कॅप्टन आर. सेल्वन, सर्वश्री. अजय चौधरी, अशोक पाटील, अनंत (बाळा) नर, तुकाराम काते, सुनिल प्रभू, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे लक्ष वेधतील :-**

"मागील अनेक वर्षांपासून सायन कोळीवाडा तसेच संपूर्ण मुंबईमध्ये एसआरए प्रकल्प अपूर्ण अवस्थेत असणे, विकासक LOI प्राप्त झाल्यानंतर बरेच वर्ष बांधकाम पूर्ण न करणे, या कालावधीत नागरिकांचे भाडे थकीत असणे, एसआरए मधील अभियांत्रिकी विभाग प्रत्यक्ष बांधकामाची तपासणी न करता, विकासकाला चुकीच्या पद्धतीने पार्ट OC देत असल्याची बाब निदर्शनास येणे, एखाद्या एसआरए प्रकल्पात स्थानिक लोकप्रतिनिधी आणि स्थानिक रहिवाशी यांना विश्वासात न घेता एसआरए अधिकारी आपल्या मर्जीतील विकासकाची पार्श्वभूमी न तपासता स्वहिताकरिता एखाद्या विकासकाची जबरदस्तीने नेमणूक करीत असणे, परिणामी विभागातील रहिवाश्यांमध्ये शासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष, रखडलेले पुनर्वसन प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करून बेघर झालेल्या नागरिकांना त्यांच्या स्वमालकीची हक्काची घरे मिळवून देण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(६) सर्वश्री. अमोल खताळ, सुरेश धस, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात तुकडे जोड तुकडे बंदी कायदा", ज्याला मुंबईत साधारणपणे तुकडे पाडा प्रतिबंधित करणे आणि त्याचे एकत्रीकरण करणे कायदा, १९४७" लागू असणे, सदर कायद्याचे कलम ३ प्रमाणे शासनाने स्थानिक क्षेत्र म्हणून जिल्हा अहिल्यानगर मधील अहमदनगर, पारनेर, श्रीगोंदा, कर्जत, जामखेड, शेवगाव, पाथर्डी नेवासा, राहुरी, कोपरगाव, संगमनेर, अकोला, बेलापूर, अहमदनगर, कोपरगाव, श्रीरामपूर आणि संगमनेर यांचे नगरपालिका हद्दी वगळून आणि अहमदनगर, कोपरगाव, श्रीरामपूर आणि संगमनेर यांचे नगरपालिकेचे २ मैलाचे परिसराखेरीज घोषित केले असणे, नगरपालिका हद्दीपासून दोन

मैल अंतरापर्यंत तुकडे जोड तुकडे बंदी कायदा लागू होत नसणे तसेच नगररचना या विभागाकडे त्या त्या तालुक्यातील शहरालगत रिजनल प्लॅन काही गावांना लागू असल्याने रीजनल प्लॅनमध्ये समाविष्ट असलेल्या गावांना तुकडे जोड तुकडे बंदी कायदा लागू होत नसणे, नगर रचना विभागाची नियमावली असणे, परंतु रीजनल प्लॅन लागू असलेल्या समाविष्ट गावांमध्ये एक व दोन आर गुंठ्ठयांचे खरेदीखत नोंदवणे बाबत अंमलबजावणी होत नसणे, ज्या तालुक्याच्या शहरालगत गावांचा समावेश केलेला आहे अशा गावांमध्ये तात्काळ याबाबत अंमलबजावणी आवश्यक असणे, परंतु शासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याने स्थानिक नागरिकांमध्ये शासनाप्रति पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

**(७) श्री.संजय उपाध्याय, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई शिक्षण उपसंचालक, संदीप सांगवे यांनी दिलेल्या शालार्थ आयडीत व शिक्षण समायोजनात मोठ्या प्रमाणात अनियमितता असल्याने सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी विविध शिक्षक संघटना करीत असणे, तसेच उपसंचालक मुंबई कार्यालयाकडून शालार्थ आयडी साठी आलेल्या फाईल अनेक वर्षे पेंडिंग ठेऊन पुन्हा निकाली काढण्यात येत असल्याने यामध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार होत असल्याची शंका निर्माण होणे, मुंबई उपसंचालक कार्यालयाने शालार्थ आयडी फाईलचा क्रमांक व प्रत्यक्ष शालार्थ आयडीला दिलेली तारीख, प्रत्यक्षात उपसंचालक कार्यालयाने त्या शाळेला केलेला मेल याची तपासणी करणे आवश्यक असणे, त्यामुळे बॅक डेटेड तारखेला केलेला मेल आयडी तसेच शिक्षकाला प्रत्यक्ष मिळालेले वेतन याची तपासणी आवश्यक असणे, मुंबईत अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करताना शिक्षण उपसंचालकाने शिक्षक अधिकाऱ्यांना पत्र देऊन नियम डावलून सेवाज्येष्ठता देऊन समायोजन केल्याने अर्थपूर्ण व्यवहार झाल्याची शंका निर्माण होत असणे, मुंबईतील काही शिक्षकांचे समायोजन बाहेर करून वेतन बंद केले जात असून काही शिक्षकांचे पगार सुरू ठेवले जात असल्याने मागील दोन वर्षातील आत्तापर्यंत केलेल्या सर्व समायोजनाची तपासणी करून मुंबईतील रात्र शाळेबाबतही शासनाने धोरण ठरवण्यासाठी समिती नेमणे, मात्र या समितीचाही अहवाल आलेला नसताना शिक्षण उपसंचालकाने स्वतःच धोरण निश्चित करून नियुक्त करणे, या व अन्य समस्यांमुळे मुंबई उपसंचालक कार्यालयाकडून मागील दोन वर्षात केलेल्या सर्व शालार्थ आयडी देण्याची सखोल चौकशी करण्याची मागणी मुंबईतील शिक्षक आणि लोकप्रतिनिधींकडून होत असणे, राज्यातील इतर विभागात शालार्थ आयडीची एसआयटीमार्फत चौकशी सुरू करण्याची मागणी होत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**( सकाळी ११.०० वाजता )**

**एक : प्रश्नोत्तरे**

**(अ) तारांकित प्रश्न**

**(ब) तारांकित प्रश्नाबाबतची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** : "जळगाव जिल्ह्यात राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेमध्ये होत असलेला गैरव्यवहार" या विषयावरील श्री. संजय वामन सावकारे वि.स.स यांचा दिनांक १० जुलै, २०२४ रोजी उत्तरीत झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक ७९९८७ च्या अनुपूरक प्रश्नोत्तरांच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार प्रश्नाची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**(१) उप मुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री** : महा मुंबई मेट्रो (एम ३) संचलन महामंडळ मर्यादित यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(२) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** :

**(क)** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा विसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(घ)** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ङ)** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचा २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

एचबी-०३२५ (२७००-०७-२०२५)-२

**(३) उद्योग मंत्री** : महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांचे सन २०२०-२०२१ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

(१) **सर्वश्री. राजेंद्र गावित, उमेश यावलकर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात विविध जिल्ह्यांमध्ये आदिवासींच्या जमिनी या बिगर आदिवासी होत असणे, त्यामुळे आदिवासी समाज भूमिहीन होत असणे, तसेच आदिवासी हा मूळ शेतीवर उपजिका करणारा शेतकरी शेतमजूर असून त्याचे संपूर्ण कुटुंब हे शेती तसेच शेतीशी निगडित व्यवसायावर आधारित असणे, मात्र काही व्यवसायिक कारणास्तव आदिवासी जमीन बिगर आदिवासी यांच्या नावाने खरेदी विक्री केली जात असणे, बृहन्मुंबई महानगरपालिका तसेच इतर महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणात आदिवासी जमिनी बिगर आदिवासी खरेदी होत असणे, महाराष्ट्र अनुसूचित जमातीच्या जमिनी परत करणे अधिनियम १९७४ व महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ चे कलम ३६(अ) आणि ३६ (ब) अन्वये आदिवासी जमीन बिगर आदिवासीला विक्री करण्यास परवानगी बाबत अटींची पूर्तता न करणे, त्यामुळे मा. राष्ट्रपतींचे अध्यादेशाचे भंग होत असणे, तसेच, आदिवासींचे कुळ असताना सुद्धा तहसिलदारांकडून कुळ परस्पर रद्द करण्यात येणे, आदिवासींसाठी असलेल्या कायद्याचे भंग होणे, आदिवासी ते बिगर आदिवासींकडे हस्तातरीत करीत असताना अनेक त्रुटींचा अभाव असणे, यावर योग्य ती नियमावली तयार करणे आवश्यक असणे, तसेच महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील आदिवासी जमीन या बिगर आदिवासी खरेदी विक्री हस्तांतरण होत असताना यावर प्रतिबंध करणे आवश्यक असणे, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वारंवार शासनाला अवगत करणे, उक्त प्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **श्रीमती अनुराधा चव्हाण, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील फुलंब्री शहरातील गट नं. १७/१ मध्ये बनावट एन.ए.करून नगररचना विभागाचे खोटे सही शिक्के मारून प्लॉटची विक्री करण्यात आल्याचा प्रकार मे, २०२५ मध्ये उघडकीस आला असणे, शहरातील गट नंबर १७ ची फोड करून १७/१ अस्तित्त्वात आणला असून त्याचे एकूण क्षेत्र चार ते पाच एकर असणे, सदरील प्लॉटच्या विक्रीसाठी डेव्हलपरने पूर्ण प्लॉट विकणे, २०१७ मध्ये नगरपंचायत अस्तित्वात असताना २०१४ चा ग्रामपंचायत काळातील मागील तारखेत एन.ए. ४४ लेआऊट टाकणे, तत्कालीन तलाठी यांनी दिनांक १ मार्च, २०१८ मध्ये ऑनलाइन फेर टाकणे, तत्कालीन मंडळ अधिकारी यांनी दिनांक १३ मार्च, २०१८ रोजी फेर मंजूर करणे, सातबारा अकृषक क्षेत्र असल्याने नागरिकांनी प्लॉटची खरेदी करणे, परंतु सदरील एन.ए. ४४ हा बनावट असल्याचे २०२५ रोजी उघड होणे,

एन.ए. ४४ ची उपविभागीय अधिकारी कार्यालयात नोंदच नसल्याचे उपविभागीय अधिकारी यांनी लेखी लिहून देणे, नगररचना विभाग येथील अधिकारी यांनी देखील नोंद नसल्याचे लेखी लिहून देणे, त्यानंतर बिल्डर आणि डेव्हलपर यांच्यावर फुलंब्री पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात येणे, सद्य:स्थितीत ७ वर्षांपूर्वी विकत घेतलेल्या प्लॉटधारकांना बांधकाम परवानगी मिळत नसल्याने ते त्रस्त असणे, उक्त प्रकरणी सखोल चौकशी करून संबंधित दोषींवर तात्काळ कारवाई करण्याची आवश्यकता, तसेच प्लॉट खरेदी करणा-यांना दिलासा देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(३) सर्वश्री. अनुप अग्रवाल, गोपिचंद पडळकर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"भारतीय संविधानाच्या पाचव्या अनुसूचीनुसार महाराष्ट्रातील नंदूरबार जिल्हा हा अनुसुचित क्षेत्र म्हणून घोषित केलेला असणे. नंदूरबार जिल्ह्यातील आदिवासी व इतर पारंपारिक वन निवासी लोकांच्या हिताचे व अधिकारांचे संरक्षण करणे हा अनुसूचित क्षेत्र घोषित करण्यामागचा उद्देश असणे. नंदूरबार जिल्ह्यात प्रामुख्याने भिल्ल व पावरा या जनजाती समुहातील आदिवासी असणे, सदर जनजाती समूहाच्या धार्मिक आस्था, श्रध्दा तसेच परंपरा या विविध देवांना तसेच नैसर्गिक घटकांना समर्पित असणे. नंदुरबार जिल्ह्यामध्ये, विशेषतः नवापुर तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणात आदिवासी व बिगर आदिवासी समुदायातील व्यक्ती व कुटुंबे यांचे खिस्ती धर्मगुरु, मिशनरी व संस्था यांच्याकडून प्रलोभन तसेच आमिष दाखवून धर्मांतर झालेले असणे व सुरु असणे, परकीय निधीतून आरोग्य, शिक्षण, वैचारिक व आर्थिक उन्नती इत्यादी बाबींकरिता धर्मदायतेच्या नावाखाली खिस्ती मिशनरी यांच्याकडून आदिवासी व बिगर आदिवासी समुहातील व्यक्तींना हिंदू धर्म त्यागून, ख्रिश्चन धर्म स्वीकारण्यास प्रवृत्त केले जात असणे, त्यामुळे या आदिवासींची सांस्कृतिक तसेच धार्मिक ओळख पुसली जात असणे, नंदुरबार जिल्ह्यात बहुतेक गावांमध्ये खिस्ती मिशनरी तसेच धर्मांतरीत व्यक्ती यांच्याकडून खाजगी तसेच शासकीय जागेवर, संबंधित गावच्या ग्रामपंचायतची तसेच गृह विभागाची परवानगी न घेता, अनधिकृतरित्या १५० हून अधिक चर्चेसचे बांधकाम केलेले असणे, सदर गंभीर प्रकरणाबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(४) डॉ. राहूल पाटील, सर्वश्री. संतोष दानवे, अब्दुल सत्तार, उमेश यावलकर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेंतर्गत शासनाने अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब लाभार्थी सदस्यांच्या संख्येच्या आधारे सुधारित इष्टांक देण्याकरीता शिधापत्रिका व्यवस्थापन प्रणाली (RCMS) वर Digitisatio करण्यात येणे, त्यानुषंगाने जिल्हा पुरवठा अधिकारी, परभणी यांनी जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील तहसीलदारांना इष्टांक वाढीची पुर्तता करण्याबाबत दिनांक २ एप्रिल, २०२५ रोजी सूचना देणे, परभणी तालुक्यातील अंत्योदय योजनेकरीता केवळ २४ आणि प्राधान्य कुटुंबाकरीता ५०८४

इष्टांक वाढ करणे, परभणी तालुक्यात उक्त योजनांचा इष्टांक शिल्लक नसल्यामुळे इन्सपेक्टर ०१ आणि ०२ लॉगीनला १८०८ संचिका अद्यापही शिल्लक असणे, परभणी तालुका हा जिल्हा मुख्यालय तसेच महानगरपालिका क्षेत्र असुन येथे मोठ्या प्रमाणात नागरिक रहिवासी असल्यामुळे तालुक्यातील अंत्योदय योजनेकरीता ५००० तर प्राधान्य कुटुंबाकरीता ६०००० वाढीव इष्टांक उपलब्ध करुन देण्याची विनंती तहसिलदार, परभणी यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे दिनांक २९ एप्रिल, २०२५ रोजी केलेली असणे, परंतु त्यावर अद्यापही कार्यवाही न होणे, परिणामी तालुक्यातील अनेक कुटुंबे धान्यापासून वंचित असणे, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करुन परभणी तालुक्याकरीता मागणीच्या अनुषंगाने वाढीव इष्टांक देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."

**(५) सर्वश्री. संतोष दानवे, नारायण कुचे, सुधीर मुनगंटीवार, बबनराव यादव (लोणीकर), वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपत्ती व्यवस्थापन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"जालना जिल्ह्यात २०२२ ते २०२४ या कालावधीत नैसर्गिक आपत्तीपोटी शेतकऱ्यांना द्यावयाच्या अनुदान वितरणात तब्बल ४२ कोटींचा अपहार होणे, अंबड व घनसावंगी तालुक्यात बनावट लाभार्थी, शासकीय व लागवडीखाली नसलेल्या जमिनी, एकाच नावावर दुबार अनुदान आणि अधिकारपत्रांचा गैरवापर करून हा घोटाळा करण्यात आलेला असणे, यामध्ये तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहायक, वरिष्ठ लिपिक अशा किमान ७४ अधिकाऱ्यांचा सहभाग उघड होऊन २१ अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आलेले असणे, आतापर्यंत ५.७६ कोटींची वसुली झाली असली तरी चौकशी सुरूच असून प्रकरणाची व्याप्ती १०० कोटी पर्यंत आढळण्याची शक्यता असणे, या प्रकरणामुळे शासन योजनांवरील शेतकऱ्यांचा विश्वास डळमळीत झाला असून संतापाची भावना तीव्र होत असणे, अशा गंभीर गैरव्यवहारामुळे योजनांची पारदर्शकता, प्रशासकीय नीतिमत्ता आणि सार्वजनिक संसाधनांवरील नियंत्रण धोक्यात येण्याची शक्यता असणे, यामुळे शासनाने दोषींवर कठोर कारवाई करणे आवश्यक असणे, अशा आपत्ती अनुदान वितरण करण्यासाठी एकसंध व पारदर्शक ऑनलाईन पोर्टल तयार करून त्याद्वारे मदतीचे अर्ज, प्रमाणपत्र, मंजुरी व वितरण या साऱ्या प्रक्रिया राबविणेसाठी करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना."

**(६) श्री. राजेश पवार, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"कंधार, बिलोली, नायगाव व मुखेड (जि. नांदेड) तालुक्यात दिनांक १ जानेवारी, २०२१ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०२३ या कालावधीत शेतकऱ्यांसाठी सुक्ष्म सिंचन योजना राबविण्यात येणे, सदर योजना राबवितांना तत्कालिन कृषी पर्यवेक्षक यांनी योजनेतील वितरित ठिंबक व तुषार सिंचनाचे मार्गदर्शक सूचनांची तपासणी न करता खाजगी वितरकांसोबत संगनमत करुन बनावट दस्ताऐवज कृषी कार्यालयात दाखल करुन शासनाचे ५ कोटी ९८ लाख रुपयांचा अपहार केल्याची घटना माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली असणे, याप्रकरणी जिल्हा कृषी कार्यालयातील

तंत्र अधिकारी यांनी कृषी पर्यवेक्षक व इतर कृषी वितरक यांचे विरुद्ध गुन्ह्याची तक्रार दाखल केली असणे, सदर फिर्यादीवरुन नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात कृषी पर्यवेक्षक व इतर कृषी वितरक यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करुनही अद्यापपर्यंत दोषींवर कोणतीही कारवाई करण्यात आली नसणे, सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी चौकशी करुन दोषी अधिकारी व इतर संबंधितांवर कडक कारवाई करण्याची माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केली असणे, याबाबत शासनाने सुक्ष्म सिंचन योजनेत बनावट दस्ताऐवज दाखल करुन शासनाची फसवणूक करणाऱ्या दोषींकडून अपहाराची रक्कम वसूल करुन दोषींवर करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

**(७) सर्वश्री. राजेश विटेकर, अस्लम शेख, अमीन पटेल, श्रीमती ज्योती गायकवाड, डॉ. विश्वजित कदम, सर्वश्री. विकास ठाकरे, संजय मेश्राम, अमित झनक, काशिनाथ दाते, सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"पिक विमा कंपनीने परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आर्थिक मदतीपासून वंचित ठेवणे, हवामानातील प्रतिकूल परिस्थिती, Event Break च्या तक्रारी ग्राह्य न धरणे, स्थानिक नैसर्गिक आपत्ती नुकसान भरपाई शेतकऱ्यांच्या याद्या कार्यालयास सादर न करणे, दिनांक १९ व २० ऑगस्ट, १९ व २० सप्टेंबर तसेच १९ व २० ऑक्टोबर रोजी झालेल्या पावसाबाबत शेतकऱ्यांनी केलेल्या तक्रारी कंपनीने मान्य न करणे, काढणी पश्चात व पीक कापणी प्रयोग आधारित पिक विमा वाटपास विलंब, पीक नुकसानीच्या नाकारलेल्या व स्वीकारलेल्या तक्रारींची यादी, विविध मुद्यांवरून जिल्हाधिकारी परभणी यांनी दिनांक ७ मे, २०२५ दरम्यान घेतलेल्या बैठकीत सदरील विमा कंपनीस आदेशित करूनही त्या सर्व मुद्यांची सोडवणूक न होणे, पीक कापणी प्रयोगात कमी उत्पन्न आलेले असतानाही पीक कंपनीने विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे आक्षेप दाखल करून वेळकाढूपणाचे धोरण राबवणे, शेतकऱ्यांना मदतीपासून वंचित ठेवणे, ही दिरंगाई व बनवाबनवी लक्षात घेऊन कृषी मंत्री यांनी पुणे येथील कृषी आयुक्त, कृषी संचालक, व जिल्हाधिकारी परभणी यांनी लक्ष घालून तात्काळ कारवाई करावी असे आदेश ४ जून, २०२४ दरम्यान कृषी मंत्री कार्यालयात झालेल्या बैठकीत दिलेले असणे, मात्र कृषी आयुक्त स्तरावरून कोणतीही अंतिम कार्यवाही न होणे, शासनाने त्यावर करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(८) सर्वश्री. रोहित पाटील, हेमंत ओगले, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मागील २ वर्षांपासून मे महिन्यात झालेल्या व सलग होत असलेल्या अवकाळी मान्सूनपूर्व पावसामुळे द्राक्ष पिकावर मोठा परिणाम झाला असणे, खरड छाटणीनंतर काडी निर्मिती, गर्भधारणा व फळधारणेचा अत्यंत संवेदनशील टप्पा असणे, याच काळात अनेक भागांमध्ये २५० ते ४०० मिमी पावसाने हजेरी लावल्यामुळे द्राक्ष पिकांमध्ये घडांची गुणवत्ता, फळाची गर्भधारणा आणि उत्पादनावर नकारात्मक

परिणाम झाला असणे, अशा अवकळी पावसामुळे रोगराई व किडीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला असणे, फळांच्या आकारमानावर व द्राक्षांच्या दाण्यांवर प्रत्यक्ष फटका बसलेला असणे, संवेदनशील कालावधीमध्ये शेतकऱ्यांचे रसायने, इंधन, मजुरी खर्च करत असून पावसामुळे हा सर्व झालेला खर्च वाया जाणे, एकरी अंदाजे १५ ते २० हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे असणे, दरवर्षी मे महिन्यात अशा प्रकारच्या हवामान बदलामुळे द्राक्ष उत्पादक अडचणीत सापडणे व अशा परिस्थितीचा द्राक्ष शेतीवर मोठा परिणाम होत असणे, त्यामुळे शासनाने हवामान बदलाचा अभ्यास करून या संकटाचा कायमस्वरूपी उपाय काढणे गरजेचे असणे, या परिस्थितीत शासनाने नुकसानग्रस्त द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांसाठी केलेली कार्यवाही आणि याबाबत शासनाची अधिकृत भूमिका."

**(९) श्री. संजय मेश्राम, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मजुरांचे जीवनमान उंचावण्यासाठी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या शासनाच्या योजनेत सुरुवातीपासूनच अनियमितता असणे, तसेच उमरेड विधान सभा मतदार संघातील तालुका उमरेड, भिवापूर, कुही येथील कामगार कल्याणकारी मंडळाच्या सुरक्षा पेटी आणि डिनरसेट वाटपात मोठ्या प्रमाणात अनियमितता सुरू असून मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असणे, तसेच किट वाटप कार्यक्रमात बोगस लाभार्थ्यांचा सुळसुळाट आणि दलालांचा खुलेआम वावर सुरू असल्याचे स्पष्टपणे दिसून येत असणे, या योजनेअंतर्गत खऱ्या लाभार्थ्यांचे नाव यादीत असूनही त्यांना प्रतीक्षा करावी लागत असणे. यादीत नाव नसलेल्यांशी दलाल आधीच संपर्क साधून पेटी व डिनरसेट मिळवून देण्याच्या मोबदल्यात ८०० ते ९०० रुपये उकळत असणे, योजनेत लाभ घेणाऱ्यांची सखोल चौकशी करून बोगस नोंदणी हटवावी आणि खऱ्या मजुरांना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी नोंदणीकृत कामगारांकडून होत असणे, सदर प्रक्रियेत सुरू असलेल्या अनागोंदी बाबत प्रशासन ठोस पावले उचलत नसल्याचे निदर्शनास आले असणे, तसेच नागपूर जिल्हा कामगार विभागाच्या संबंधित आयुक्त, उपायुक्त, जबाबदार अधिकारी व एजन्सी यांच्या संगनमताने भ्रष्टाचार होत असल्याचे समोर आले असणे, परंतु प्रशासन या बाबत कोणतीच कारवाई करीत नसल्याने सामान्य लाभार्थी, कामगार महिला यांच्या मध्ये शासनाच्या विरोधात तीव्र संतापाची भावना निर्माण झाली असणे, परिणामी शासनाने तातडीने करावयाची कारवाई, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

**चार : सन २०२५-२०२६ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान (दुसरा व शेवटचा दिवस)**

(१) नगरविकास विभाग

(२) सार्वजनिक बांधकाम विभाग

(३) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग

**(मतास टाकावयाच्या मागण्यांची सूची स्वतंत्रपणे वितरीत केल्याप्रमाणे)**

**(चर्चारोध (गिलोटीन) सायंकाळी ५.३० वाजता)**

**पाच : शासकीय विधेयके :-**

**(अ) पुर:स्थापनार्थ, विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७८ - महाराष्ट्र (द्वितीय पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२५

---

**(ब)** सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ - महाराष्ट्र विशेष जन सुरक्षा विधेयक**,** २०२४ यावरील दोन्ही सभागृहांच्या संयुक्त समितीचे प्रतिवृत्त सादर करणे.

---

**(क) विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

**(१) (क)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७६ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७६ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमीन पटेल, नाना पटोले, विकास ठाकरे, श्रीमती ज्योती गायकवाड, डॉ. विश्वजित कदम, सर्वश्री.साजिद पठाण, रामदास मसराम व हेमंत ओगले, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७६ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भास्कर जाधव, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७६ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२) (क)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७७ - महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण (सुधारणा) विधेयक, २०२५

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७७ - महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण (सुधारणा) विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमीन पटेल, नाना पटोले, विकास ठाकरे, श्रीमती ज्योती गायकवाड, डॉ. विश्वजित कदम, सर्वश्री साजिद पठाण, रामदास मसराम व हेमंत ओगले, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७७ - महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण (सुधारणा) विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**सहा : (मंगळवार, दिनांक ८ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री आदित्य ठाकरे, विजय वडेट्टीवार, जयंत पाटील, भास्कर जाधव, नाना पटोले, सुनिल प्रभू, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. दिलीप सोपल, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री रोहित पाटील, अजय चौधरी, अमित देशमुख, रोहित पवार, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री अमीन पटेल, उत्तमराव जानकर, कैलास घाडगे-पाटील, अस्लम शेख, नितीन देशमुख, सुनिल राऊत, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री संजय पोतनीस, बापूसाहेब पठारे, वरुण सरदेसाई, अमित झनक, अनंत (बाळा) नर, अभिजीत पाटील, हारुन खान, शिरीषकुमार नाईक, सिध्दार्थ खरात, संदिप क्षिरसागर, नारायण पाटील, गजानन लवटे, विकास ठाकरे, महेश सावंत, मनोज जामसुतकर, साजिद खान पठाण, प्रविण स्वामी, संजय मेश्राम, रामदास मसराम, संजय देरकर,**

**बाबाजी काळे, हेमंत ओगले, डॉ. ज्योती गायकवाड, श्री.अनिल मांगुळकर, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्याचे कृषी मंत्री सिन्नर तालुक्यात नुकसानग्रस्त शेतीची पाहणी करतांना त्यांनी" ढेकळांचे पंचनामे करायचे का ?" असे शेतकऱ्यांच्या भावना दुखावणारे केलेले वक्तव्य, जालना जिल्हयातील परतूर विधानसभा मतदार संघात" हर घर सौर" योजनेवरील एका कार्यक्रमात सत्तारुढ पक्षाच्या एका विधीमंडळ सदस्याने " आपल्यामुळे कपडे, बुट, मोबाईल योजनांचे आर्थिक फायदे आणि पेरणी करण्यासाठी पैसे मिळतात" असे शेतकऱ्यांना उद्देशून उद्‌गार काढणे, मे, २०२५ च्या शेवटच्या आठवड्यामध्ये राज्यातील सर्वच भागात वादळी वाऱ्यासह मुसळधार झालेला पाऊस, त्यामुळे अनेक जिल्ह्यात निर्माण झालेली पूरपरिस्थिती, नद्यांचे पाणी पात्राबाहेर जाणे, अनेक ठिकाणी दरडी कोसळून विस्कळीत झालेली वाहतूक, केळी, पेरु, द्राक्ष, डाळींब इत्यादी फळपिकांचे झालेले मोठे नुकसान, राज्य सरकारने नुकसानीबाबत पंचनामे त्वरित करणे व शेतकऱ्यांना दर हेक्टरी ५० हजार रुपयांची नुकसान भरपाई देण्याची मागणी, शेतकऱ्यांना नुकसान भरपाई वाटपात विविध जिल्ह्यात झालेले भ्रष्टचार, मे महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे कोकणातील मासेमारी बंद राहिल्याने मच्छिमारांचे झालेले नुकसान, दरवर्षी मे, महिन्यात कोकणात पर्यटक मोठ्या प्रमाणावर येत असतात, परंतु यावर्षी अतिवृष्टीमुळे पर्यटकांची संख्या कमी होणे व पर्यटन व्यवसायावर अवलंबून असणाऱ्या पर्यटन व्यावसायिकांचे झालेले अतोनात नुकसान, दरवर्षी कोकणात साधारणपणे २३ मे पासून भात आणि नागलीची पेरणी सुरु होते, परंतु यावर्षी १५ मे पासूनच पावसाला सुरुवात झाल्यामुळे पेरणी पूर्वीची कामे न होणे, तसेच रायगड जिल्ह्यात रब्बी हंगामातील पिकांच्या कापणीची कामे सुरु असतांनाच पाऊस सुरु झाल्याने भात मातीत मिसळून पूर्णपणे वाया जाणे, कोकणातील सदरहू परिस्थिती पाहता कोकणातील शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य करण्याकरिता शासनाने विशेष मदतीचे पॅकेज जाहीर करण्याची लोकप्रतिनिधींनी केलेली मागणी, विशेष आर्थिक पॅकेज जाहिर करण्याची आवश्यकता, कांदा उत्पादक शेतकऱ्यांची होत असलेली पिळवणूक, राज्य शासनाने कृषि क्षेत्राला अग्रेसर ठेवण्यासाठी महाॲग्रो एआय धोरणास (२०२५ ते २०२९) शासनाने दिलेली मंजूरी, एका रुपयांत पीक विमा योजना बंद करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असणे, शेतकऱ्यांना कृषी विम्याची रक्कम दिली जात नसून विमा कंपन्यांना कृषि विम्याचा लाभ झाला असणे, संपूर्ण राज्यात बोगस बीटी बियाण्याचा धुमाकूळ सुरु असून यावर्षी बोगस बीटी बियाणे ३० टक्क्यापेक्षा जास्त विकले गेल्याची बाब निदर्शनास येणे, बिटी बियाणांची बिनधास्त विक्री सुरु असून त्यांचे बिंग फुटू नये म्हणून बियाणे लेबलविना, खुल्या पाकिटमध्ये विकले जात असणे, शासनाने शेतकऱ्यांना कर्जमाफीची घोषणा निवडणूकी अगोदर केली असून अद्यापही सरसकट कर्जमाफीची घोषणा न करणे, कापसाच्या पालवीवर वाणी नावाचा रोग आला असून त्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होणे, तसेच शेतकऱ्यांकडून खरेदी केलेल्या धानाचे पैसेही अद्याप मिळालेले नसणे, दि. १ जानेवारी ते ३१ मार्च, २०२५ या तीन महिन्यांच्या कालावधीत विदर्भ व मराठवाड्यातील २६७ शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्या, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या बऱ्याच कुटुंबियांना अद्यापही आर्थिक मदत न मिळणे, विदर्भातून गोव्याला जाण्यासाठी ८६ हजार कोटी रुपयांचा शक्तिपीठ महामार्ग करण्याची आखलेली योजना, वास्तविक पाहता या अंतर्गत असलेल्या

मंदिरांकडे जाण्यासाठी तयार असलेल्या उत्तम रस्त्यांचे जाळे, शक्तिपीठ महामार्गामध्ये १२ जिल्ह्यातील शेतकरी बाधित होणार असल्याने दि.१.७.२०२५ पासून १२ जिल्ह्यात व संपूर्ण महाराष्ट्रात रास्तारोको आंदोलन शेतकऱ्यांकडून करण्यात येणे, सदर प्रकल्पाच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या काढून घेण्यात येणाऱ्या सुपिक जमिनी या मार्गासाठी लाखो झाडांची होणारी कत्तल व पर्यावरणाचा होणारा ऱ्हास, यासाठी राज्य शासनाने नुकतीच २० हजार कोटीची तरतूद करणे व शेतकऱ्यांच्या विरोध असतांनाही दडपशाही करुन शेतकऱ्यांच्या जमिनी शक्तीपीठ महामार्गासाठी घेतल्या जाणार असणे, दिनांक २५ व २६ जून, २०२५ रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर व लोणार तालुक्यातील समृद्धी महामार्ग वाहून जाणे, सदर मुसळधार पावसामुळे सोलार पंपासह संपूर्ण सेट, पाईप लाईन, स्प्रिंकलर सेट, केबल इत्यादी वाहून जाणे, सिबिलची अट व ओटीएस ची अट केल्यामुळे बँकेतर्फे शेतकऱ्यांना पुन्हा कर्ज न मिळणे, तसेच राज्य शासनाने नोकरभरतीमध्ये कंत्राटी भरती केली असून कंत्राटी कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायद्याच्या अनुषंगाने वेतन मिळालेले नसणे, लिपिकाला १२ हजार, शिपायांना १० हजार इतका तुटपुंजा पगार दिला जाऊन एजन्सीला जास्तीत जास्त फायदा कमवून दिला जाणे, राज्याला प्रगतीपथावर नेण्यासाठी कर्तव्यदक्ष आणि स्वच्छ प्रतिमेचे अधिकारी देण्याची जबाबदारी असलेल्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) सदस्य पदी वादग्रस्त कारकीर्द राहिलेले विशेष पोलीस महानिरिक्षक दिलीप भुजबळ यांची नियुक्ती करण्यात येणे, त्यामुळे कामगारांची व बेरोजगारांची फसवणूक केली जात असणे, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही."

**सात : (मंगळवार, दिनांक ८ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री रणधीर सावरकर, अर्जुन खोतकर, अब्दुल सत्तार, सुधीर मुनगंटीवार, दिलीप वळसे-पाटील, दिपक केसरकर, सुरेश धस, धनंजय मुंडे, रमेश बोरनारे, प्रशांत बंब, संजय बनसोडे, राजेंद्र गावित, संभाजी निलंगेकर-पाटील, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री चेतन तुपे, नारायण कुचे, शांताराम मोरे, शेखर निकम, बबनराव लोणीकर, किशोर पाटील, प्रकाश सोळंके, अभिमन्यू पवार, निलेश राणे, महेश शिंदे, गोपीचंद पडळकर, अनिल पाटील, चंद्रदिप नरके, डॉ. अतुल भोसले, सर्वश्री संजय गायकवाड, राजकुमार बडोले, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री नरेंद्र भोंडेकर, चंद्रकांत सोनवणे, सर्वश्रीमती श्वेता महाले, मंजुळा गावित, श्री. प्रताप पाटील-चिखलीकर, डॉ. संजय कुटे, श्री. राजेश क्षिरसागर, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री प्रकाश भारसाकळे, महेंद्र दळवी, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री हरिष पिंपळे, महेंद्र थोरवे, श्रीमती सना मलिक, सर्वश्री प्रवीण दटके, किरण सामंत, दिलीप बनकर, देवराव भोंगळे, संतोष बांगर, बालाजी कल्याणकर, डॉ. किरण लहामटे, श्रीमती सीमाताई हिरे, सर्वश्री चंद्रकांत पाटील, विलास तरे, हिरामण खोसकर, रमेश कराड, अमोल पाटील, चंद्रकांत नवघरे, श्रीमती नमिता मुंदडा, सर्वश्री सुहास कांदे, अमोल खताळ, डॉ. तुषार राठोड, सर्वश्री विठ्ठल लंघे, राजेश पवार, बाबुराव कदम-कोहळीकर, आनंद तिडके, राणाजगजितसिंह पाटील, हिकमत उढाण, राजेंद्र यड्रावकर-पाटील, विक्रम पाचपुते,**

**राजेश मोरे, विजय शिवतारे, ॲड. राहुल कुल, डॉ. तानाजी सावंत, श्री. सुहास बाबर, डॉ. सुरेश खाडे, सर्वश्री सत्यजित देशमुख, शंकर मांडेकर, सुभाष देशमुख, अनुपभैय्या अग्रवाल, काशिराम पावरा, विजय देशमुख, दिलीप बोरसे, श्रीमती मोनिका राजळे, सर्वश्री महेश लांडगे, मंगेश चव्हाण, प्रताप अडसड, प्रविण तायडे, राजू तोडसाम, समीर कुणावार, राजेश वानखडे, राजेश बकाने, विनोद अग्रवाल, विजय रहांगडाले, किशोर जोरगेवार, डॉ. मिलिंद नरोटे, श्रीमती सई डहाके, सर्वश्री श्याम खोडे, आमश्या पाडवी, श्रीमती रंजनाताई जाधव, सर्वश्री शरद सोनवणे, उमेश यावलकर, किसन वानखेडे, कृष्णा खोपडे, किर्तीकुमार भांगडिया, तान्हाजी मुटकुळे, श्रीमती अनुराधा चव्हाण, ॲड. श्रीजया चव्हाण, सर्वश्री जितेश अंतापुरकर, करण देवतळे, चरणसिंग ठाकूर, सुधीर गाडगीळ, अमल महाडिक, हेमंत रासने, सुनिल कांबळे, मनोज घोरपडे, सचिन कल्याण-शेट्टी, शंकर जगताप, राजेश पाडवी, डॉ. आशिष देशमुख, श्री. राघवेंद्र पाटील, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री चैनसुख संचेती, केवलराम काळे, संजय पुराम, समीर मेघे, संतोष दानवे, भिमराव तापकीर, भिमराव केराम, अमोल जावळे, रत्नाकर गुट्टे, सिद्धार्थ शिरोळे, राहुल आवाडे, देवेंद्र कोठे, डॉ. विजयकुमार गावित, डॉ. राहुल आहेर, सर्वश्री मोहन मते, किसन कथोरे, प्रशांत ठाकूर, शिवाजी पाटील, काशिनाथ दाते, विजयसिंह पंडित, ज्ञानेश्वर कटके, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्र केंद्रस्थानी ठेऊन राज्यात सिंचन क्षेत्राकडे विशेष लक्ष देण्याचा शासनाचा प्रयत्न असणे, कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमता (ए-आय) तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे धोरण अंमलात आले असणे, जलयुक्त शिवार योजना, नदीजोड प्रकल्प आणि रखडलेल्या सिंचन योजनांच्या माध्यमातून कृषी सिंचन वाढविण्यावर भर देण्यात आला असणे, विदर्भातील वैनगंगा-पैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प पूर्ण झाल्यास १० लाख एकर जमीन ओलिताखाली येण्याची शक्यता असणे, नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्पामुळे नाशिक व जळगाव जिल्ह्यातील ४९,५१६ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ होणार असणे, दमणगंगा-एकदरे-गोदावरी या २३०० कोटी रुपये किंमतीच्या नदीजोड प्रकल्पामुळे ३.५५ टीएमसी पाणी उपलब्ध होणार असणे, तापी महापुनर्भरण या १९,३०० कोटी रुपये किंमतीच्या सिंचन प्रकल्पामुळे उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम विदर्भातील खारपाण पट्ट्यातील शेतकऱ्यांना लाभ होणार असणे, महाकृषी विकास अभियान अंतर्गत केवळ १ रुपयात राबविण्यात येणाऱ्या पिक विमा योजनेत नियमितता ठेवण्याच्या दृष्टीने कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी अधिक सतर्क होण्याची आवश्यकता, अटल भूजल योजना अधिक गतीमान करण्याची आवश्यकता, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा-२ ला मंत्रीमंडळाची मान्यता मिळणे, कोकणातील उल्हास आणि वैतरणा नद्यांच्या खोऱ्यातून ५४.७० टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याचा प्रकल्प प्रस्तावित असणे, राज्यात शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्वाचे पांदण रस्ते तातडीने पूर्ण करण्याकरिता "मातोश्री पांदण रस्ते योजना" अधिक सुटसुटीत करुन राबविण्याची आवश्यकता, राज्यात सन २०२४-२०२५ च्या हंगामांतर्गत सोयाबीन, तूर, ज्वारी, चना, कापूस इ. धान खरेदी झाली असणे, शासकीय खरेदी योजनेतील अनियमितता टाळण्यासाठी योजना सक्षम करण्याची आवश्यकता, राज्यात काही गावांतील शेतकऱ्यांना डिजिटल पद्धतीने देण्यात येणारे लाभ

मिळण्यात असलेल्या अडचणी दूर करण्याची आवश्यकता, 'मॅगनेट २.०' अंतर्गत कृषी व्यवसायाला चालना देण्यासाठी विशेष योजना हाती घेण्यात आली असणे, ऊर्जा वापराला प्रोत्साहन देतानाच ऊर्जा निर्मितीवर भर देण्यात येत असणे, १६००० मेगावॅट क्षमतेच्या सौरऊर्जा प्रकल्पांना गती देण्याचे धोरण आखण्यात येणे जेणेकरुन, शाश्वत व स्वच्छ ऊर्जा मिळेल आणि औद्योगिक क्षेत्राला त्याचा फायदा होईल, राज्यातील सर्व शासकीय इमारती सन २०२५ या वर्षाच्या अखेरपर्यंत संपूर्णपणे सौरऊर्जेद्वारे विद्युतीकरण करण्याचे धोरण असणे, शेतक-यांना सिंचनासाठी सौर कृषीपंप उपलब्ध करून देणारी "मुख्यमंत्री सौर कृषी योजना" राज्यात प्रभावीपणे राबविण्यात येत असणे, सौर ऊर्जेचा वापर वाढवून शाश्वत शेतीला प्रोत्साहन देण्याचे शासनाचे उद्दिष्ट असणे, महाराष्ट्र देशासाठी रोल मॉडेल व्हावे व राज्यातील शेतकरी सुजलाम-सुफलाम व्हावा यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

## अशासकीय कामकाज

**आठ : अशासकीय विधेयके :-**

**विचारार्थ :-**

**(१)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ - महाराष्ट्र दारुबंदी (सुधारणा) विधेयक, २०२५ - **सर्वश्री सुधीर मुनगंटीवार, अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे**

**(२)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ - कारागृहे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**(३)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ - महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य विधेयक, २०२५ - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**(४)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ - मोटार वाहन (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : ८ जुलै, २०२५.

**जितेंद्र भोळे,**
सचिव - १,
महाराष्ट्र विधानसभा.